**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.०२ चा उलटतपास.**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -रघुनाथ झामाजी भूडे

**वादीतर्फे वकील श्री बि.एस.मणे यांच्या मार्फत उलटतपास शपथेवर सुरू.**

**५.** माझे शिक्षण बि.एस.सी. झालेले आहे. मी मयत गंगाराम किसन सोनारकर यांना लहानपणापासून ओळखत होतो, ते मोलमजुरी करित होते. हे मला माहित नाही की, गंगाराम सोनारकर यांची शेती गट न.२०१/२ ही मौजा कोलार या गावी होती व सदर शेती ही त्यांची वडीलोपार्जित होती किंवा कसे. नि.क्र.४८ वरिल मृत्यूपत्रावर मी साक्षीदार म्हणुन सही केलेली होती. सदरचे मृत्यूपत्र हे दि.०७.०७.२०१६ रोजी करण्यात आले होते. नि.क्र.४८ वरिल मृत्यूपत्र मी वाचले होते. सदर मृत्यूपत्रावर मी तीन ठिकाणी सह्या केल्या होत्या व गंगाराम किसन सोनारकर यांनी चार ठिकाणी सह्या केल्या होत्या.

**प्रश्न-**तुम्ही सांगता मृत्यूपत्र वाचले होते तर त्यामध्ये तुमच्या शपथपत्रातील **अधोरेखांकित भाग अ** असल्याचे तुम्ही वाचले होते काय?

**उत्तर-**नाही.

हे म्हणणे खरे नाही की, मी ज्या मृत्यूपत्रावर आंगठ्याच्या निशाणी दिल्या त्या आंगठ्याच्या निशाण्या पुर्वीच दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी मृत्यूपत्रावर सह्या केल्यानंतर गंगाराम किसन सोनारकर यांनी सदर मृत्यूपत्रावर सह्या केल्या होत्या.

**प्रश्न-**तुम्ही सांगता मृत्यूपत्र वाचले होते तर त्यामध्ये तुमच्या शपथपत्रातील **अधोरेखांकित भाग ब** 'सदर शेतजमीन मयत गंगाराम सोनारकर यांनी आमच्या गावचे मालगुजार गंगाधर गोविंदराव आणदेव यांच्यापासुन दि.०९.०६.१९६७ रोजी रजिस्टर्ड विक्रीपत्र दस्त क्र.१११६ अन्वये खरेदी केलेले आहे' हा मजकुर तुम्ही मृत्यूपत्र करतेवेळी वाचले होते काय?

**उत्तर–**होय.

**६.** हे मला माहित नाही की, गंगाराम सोनारकर यांच्याकडे गट नंबर २०१/२ मौजा कोलार येथे शेतजमीन होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, गंगाराम सोनारकर हे शेतीचा व्यवसाय करायचे. हे म्हणणे खरे नाही की, गंगाराम सोनारकर यांनी गट नंबर २०१/२ मधील शेती सन १९६८ मध्ये विकली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की,

गंगाराम सोनाकर यांनी सदर शेती विकून त्या रक्कमेतुन गट नंबर ४४ मौजा म्हसाळा येथील शेती विकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, गट नंबर ४४ मधील शेती ही गंगाराम सोनारकर यांच्या स्वकष्टाची होती हे मी शपथपत्रामध्ये खोटे लिहीलेले आहे. हे मला माहित नाही की, मृत्यूपत्र करतेवेळी गंगाराम सोनारकर यांनी त्यांचे शारिरिक व मानसिक स्थिती चांगली होती याबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र आणले होते किंवा कसे.

७. मृत्यूपत्र तयार करतेवेळी गंगाराम सोनारकर यांचे वय ६५ वर्षे होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी खोटे कागदपत्रे आणले व मृत्यूपत्र तयार केले व त्यावेळी गंगाराम सोनारकर हे मृत्यूपत्र तयार करण्याकामी आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीच्या सांगण्यावरून अर्जनविस यांनी मृत्यूपत्र तयार केले होते व प्रतिवादीच्या सांगण्यावरून मी मृत्यूपत्रावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्र नि.क्र.४८ मधील मजकूर मला काही माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्र तयार करतेवेळी गंगारामचे वय ७५ वर्षे होते व ते मृत्यूपत्र तयार करण्याकामी येउ शकत नव्हते व त्या वयामध्ये त्यांना काही समजत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, गट न.२०१/२ ही गंगाराम यांची वडीलोपार्जित शेती असुनसुध्दा मी माझ्या शपथपत्रामध्ये सांगितलेले नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.४८ तयार करतेवेळी दुसरा साक्षीदार पुरूषोत्तम रेवतकर हा हजर नव्हता. आता मला नि.क्र.४८ मृत्यूपत्र दाखविण्यात आले त्यामध्ये गंगाराम सोनारकर यांचे वय ७४ आणि धंदा शेती असे लिहीलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र.४८ तयार करतेवेळी हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र.४७ वरिल खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.४८ तयार करतेवेळी मी हजर नसल्यामुळे मला त्यामधील काही माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि २४.०३.२०२६

(आर.एस.मानकर)
२ रे सह दि.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड